धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.

दिनांक : २६ जून-२०१४

## धर्मराज्य पक्षाच्या तक्रारीची तत्काळ दखल

# ठामपाने बुजविले ठाणेकरवाडीतला धोकादायक ड्रेनेज खड्डा

प्रतिनिधी / ठाणे

दि. २६ – धर्मराज्य पक्षाच्या तक्रारीची तत्काळ दखल घेऊन ठाणे महानगरपालिकेकडून ठाणेकरवाडी नाका येथील धोकादायक ड्रेनेज खड्डा बुजविण्यात आला.

ठाणेकरवाडी नाका येथील भररस्त्यावर ड्रेनेज झाकण आणि रस्ता यांचा समतोल न साधल्यामुळे रस्त्यावर खड्डा निर्माण झाला होता. यामुळे वाहनांना याचा त्रास होत होता तसेच यामुळे आपघात होण्याचीही शक्यता होती. याबाबत धर्मराज्य पक्षाच्या वतीने ठाणे शहर उपाध्यक्ष विनोद मोरे, सहसचिव निलेश राऊत, कोपरी प्रभाग समिती अध्यक्ष समीर पाटील, प्रभाग अध्यक्ष रोहन कोळी यांनी ठाणे महानगरपालिकेच्या कोपरी प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त अरविंद कोतवडेकर यांना लेखी तक्रार केली. धर्मराज्य पक्षाच्या या तक्रारीची अरविंद कोतवडेकर यांनी त्वरीत दखल घेऊन, तत्काळ ठाणेकरवाडी नाका येथील धोकादायक ड्रेनेज खड्डा बुजविला. याबद्दल धर्मराज्य पक्षाने आणि कोपरीतील जनतेने ठाणे महापालिकेचे अभिनंदन केले आहे.

---- # ----

ए/एर०३, 'पांचजन्य'-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस्
को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२,
ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, 'पांचजन्य', शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग,
द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०.
दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*"सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!"...*